# अंगणवाडी मदतनिस पदासाठीची जाहिरात सन-2025

## बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर, पत्ता:-हौसिंग सोसायटी घर नंबर 114 गणेश नगर नांदेड.

**वाचा**:- 1.**महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि**-2017 / **प्र.क्र.**279 / **का**-6 / **दि.**30.11.2018.
2.**महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि**-2022 / **प्र.क्र.**94 / **का**-6 / **दि.**02.02.2023.
3.**महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि**-2022 / **प्र.क्र.**94 / **का**-6 / **दि.**11.08.2023.
4.**महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि**-2022 / **प्र.क्र.**175 / **का**-6 / **दि.**10.01.2024.
5.**महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि**-2022 / **प्र.क्र.**175 / **का**-6 / **दि.**27.02.2024.
6. **मा.आयुक्तालयाचे स्मरणपत्र क्र.एबाविसेयो / अंगणवाडी / का**-7 / 24-25 / 27, **दि.**03.01.2025.
7.**महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि**-2022 / **प्र.क्र.**94 / **का**-6 / **दि.**30.01.2025.
8. **मा.आयुक्त, एबाविसेयो, म. रा. नवी मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र / का**-7 / 2024-25 / 517 **दिनांक** 31.01.2025.

**बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर** या प्रकल्पांतर्गत **अंगणवाडी मदतनिस** या मानधनी पदासाठी खालील नमूद रिक्त असलेल्या जागा भरावयाच्या असल्याने उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरून नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका नांदेड अंतर्गत स्थानिक रहीवाशी असलेल्या पात्र महिला उमेदवारांकडून **दि.08.04.2025 ते दि.24.04.2025** या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून) विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **रिक्त पद असलेल्या विभागाचे नाव** | **रिक्त पद असलेल्या अंगणवाडी केंद्राचे नांव व क्रमांक** | **जाहिरातीव्दारे भरावयाच्या मदतनिस रिक्त पदांचा तपशिल** |
|---|---|---|---|
| 1 | देगलुर नाका | ब्रह्मपुरी - 4 | 01 |
| 2 | | ब्रह्मपुरी - 6 | 01 |
| 3 | | हबीबिया कॉलनी-1 | 01 |
| 4 | | उमर कॉलनी -1 | 01 |
| 5 | | खुसरो नगर -1 | 01 |
| 6 | फुलेनगर | लेबर कॉलनी -2 | 01 |
| 7 | | समता नगर -1 | 01 |
| 8 | | तेहरा नगर -2 | 01 |
| 9 | | जय भिम नगर -3 | 01 |
| 10 | | श्रावस्ती नगर -2 | 01 |
| 11 | तरोडा बु. | बाजीराव नगर | 01 |
| 12 | पांडुरंग नगर | गोविंद नगर -2 | 01 |
| 13 | | पांडुरंग नगर -2 | 01 |
| 14 | | विनायक नगर | 01 |
| 15 | | दत्त नगर -2 | 01 |
| 16 | | व्येंकटेश नगर -1 | 01 |
| 17 | | महेबुब नगर | 01 |
| 18 | शोभा नगर | शोभा नगर -1 | 01 |
| 19 | | शोभा नगर -2 | 01 |
| 20 | | नाईक नगर | 01 |
| 21 | | शाहू नगर -2 | 01 |
| 22 | | श्याम नगर | 01 |
| 23 | आंबेडकर नगर | नई आबादी -4 | 01 |
| 24 | | खडकपुरा -2 | 01 |
| 25 | | बरकतपुरा | 01 |
| 26 | सिडको हडको | असर्जन -1 | 01 |
| 27 | | हडको | 01 |
| 28 | देगाव चाळ | देगावचाळ -3 | 01 |
| 29 | | बडीदर्गा -1 | 01 |
| 30 | इतवारा | साईनगर | 01 |
| | | **एकूण** | **30** |

# अंगणवाडी मदतनिस या रिक्त पदावर नियुक्ती बाबत सर्वसाधारण अटी व शर्ती

1. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि-2022 / प्र.क्र.94 / का-6 / मंत्रालय, मुंबई दिनांक 02 फेब्रुवारी, 2023 व महिला व बाल विकास विभाग शा.नि.क्र. एबावि-2022 / प्र.क्र.94 / का-6 / दि.30.01.2025 तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकातील अटी व शर्ती तसेच मा. न्यायालयाकडून देण्यात येणारे आदेश या भरती प्रक्रीयेस लागू राहतील.
2. वाचा क्र.1 ते 8 मधील सर्व अटी व शर्ती या भरती प्रक्रीयेस लागू राहतील.
3. पात्र व इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज **दि.08.04.2025 ते दि.24.04.2025** पर्यंत (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर, हौसिंग सोसायटी घर क्र.114, गणेश नगर, नांदेड यांचे कार्यालयात उमेदवारांने समक्ष सादर करणे आवश्यक आहे. (सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे) उपरोक्त नमूद अंतिम दिनांक व कार्यालयीन वेळेनंतर या कार्यालयामार्फत कोणतेही उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज दाखल करताना उमेदवारांने स्वत: उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच पोस्टाव्दारे सादर केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

**4.मदतनिस या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती:-**

**अ) शैक्षणिक पात्रता:-**

अंगणवाडी मदतनीस पदासाठी इयत्ता 12 वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.

अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज करणारे उमेदवार जर एकापेक्षा अधिक संधित इयत्ता 12 वी उत्तीर्ण झाले असल्यास सर्व गुणपत्रके अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहिल. सर्व गुणपत्रके सादर न केल्यास किमान गुण देण्यात येतील.

अर्जदाराने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार (इयत्ता 12 वी, पदवीधर, पदव्युत्तर पदवी, डी.एड, बी.एड व शासकिय मान्यता प्राप्त संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) त्यांची साक्षांकित गुणपत्रके व प्रमाणपत्रके अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**ब) वास्तव्याची अट (स्थानिक रहिवाशी)**

अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी अर्ज करणारे अर्जदार हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड अंतर्गत स्थानिक क्षेत्रातील रहीवाशी असणे बंधनकारक आहे. स्थानिक रहीवाशी बाबत आधारकार्ड / मतदार ओळखपत्र / तहसिलदार निर्गमित अलिकडील काळातील निर्गमित रहिवाशी प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

**क) वयाची अट**

अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदावर नियुक्तीसाठी वाचा क्र.02 अन्वये वयोमर्यादा 18 ते 35 वर्षे अशी राहील. तथापि, विधवा उमेदवारांसाठी ही वयोमर्यादा कमाल 40 वर्षे अशी राहील. अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे वय **दिनांक 08.04.2025** रोजी 18 वर्षापेक्षा कमी व 35 वर्षापेक्षा जास्त नसावे. विधवा उमेदवारांसाठी 40 वर्षापेक्षा जास्त नसावे. अर्जासोबत वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) किंवा इयत्ता 10 वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (सनद) सादर करणे बंधनकारक राहील.

**ड) लहान कुटूंबाची अट**

अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी लहान कुटूंबाची अट वाचा क्र.05 च्या शासन निर्णयाप्रमाणे खालील प्रमाणे लागू राहील.

(I) लहान कुटूंब याचा अर्थ, उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये.

(II) उमेदवाराला दोन हयात अपत्यांपेक्षा अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्ती नंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. पुर्वीचे केवळ एकच मूल असेल त्या बाबतीत नंतरच्या एकाच प्रसुतीत जन्मलेल्या एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल.

(III) दोन हयात अपत्य असूनही तिसरे अपत्य झाल्यास सेवेतून काढून टाकण्यात येईल.

(IV) मुल किंवा अपत्य यामध्ये दत्तक घेतलेल्या मुलांचा किंवा मुलींचा समावेश होणार नाही.

लहान कुटूंबाबाबत उमेदवाराने अर्जासोबत स्वयंघोषित प्रमाणपत्र देणे बंधनकारक असेल. स्वंयघोषित प्रमाणपत्र अर्जासोबत सादर न केल्यास अथवा चुकीची / खोटी किंवा दिशाभुल करणारी माहिती सादर केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

(V) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र विवाहीत, अविवाहीत, विधवा, परित्यक्ता सर्व महिलांना अनिवार्य आहे. ते सोबत न जोडल्यास उमेदवाराला अपात्र करण्यात येईल.

**इ) विधवा महिला व अनाथ मुली**

अर्जदार विधवा, अनाथ असल्यास त्यांना सुधारीत गुणदान पध्दतीमध्ये उपरोक्त वाचा क्र.07 च्या शासन निर्णयातील परिशिष्टामधील गुणवत्ता यादी तयार करताना अशा विधवा महिला / अनाथ मुलींना 10 अतिरिक्त गुण देण्यात येतील. त्यासाठी खालील सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. प्रमाणपत्र असल्यास अतिरिक्त गुण दिले जातील, अन्यथा अतिरिक्त गुण दिले जाणार नाहीत.

| अ.क्र. | प्रकार | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| 1 | शासकिय संस्थेत व शासन अनुदानित संस्थेत राहत असलेल्या अनाथ मुली तसेच इतर अनाथ मुली | विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग |
| 2 | विधवा महिला | पतीचे मृत्यु प्रमाणपत्र व पुर्नविवाह न केल्याबाबतचे स्वयंघोषणा पत्र |

**ई)** मागासवर्गीय उमेदवार असल्यास (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती) त्यांना उपरोक्त वाचा क्रमांक 07 मधील परिशिष्टानुसार गुणवत्ता यादी तयार करताना 05 गुण अतिरीक्त देण्यात येतील व उमेदवार विमुक्त जाती / भटक्या जमाती / आर्थिकदृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग / इतर मागासवर्गीय / सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग इत्यादी उमेदवारांना 03 अतिरिक्त गुण देण्यात येतील. त्यासाठी उपविभागीय अधिकारी / तहसिलदार / सक्षम प्राधिकारी यांचे कडुन निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा अतिरिक्त गुण देता येणार नाहीत. अर्ज दाखल करण्याच्या अंतिम तारखेच्या कार्यालयीन वेळेनंतर कोणतेही कागदपत्र स्विकारले जाणार नाहीत.

**उ) अनुभव**

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस म्हणून कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास उपरोक्त वाचा क्रमांक 07 मधील परिशिष्टानुसार गुणवत्ता यादी तयार करताना 05 गुण अतिरीक्त देण्यात येतील. (संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मुळ अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.)

**ऊ) भाषेचे ज्ञान**

ज्या अंगणवाडी केंद्रासाठी मदतनीसची नियुक्ती करावयाची आहे अशा अंगणवाडी केंद्रामध्ये 50% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा. उर्दू, हिंदी, माडिया, गोंड, कोकणी, पावरी, कन्नड, कोरकू, तेलगू, भिल्लोरी, बंजारा इत्यादी) बोलणारी असतील तर अशा अंगणवाडी केंद्रावर त्या भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहिता व वाचता येणे) तसेच त्यांना मराठी भाषेचे ज्ञान असणे देखील आवश्यक आहे. तथापी अशा उमेदवाराने इयत्ता 10 वी अथवा वाचा क्रमांक 07 च्या परिशिष्टामधील नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

**ऊ)** i) उपरोक्त रिक्त पदांपैकी **हबीबिया कॉलनी**-1, **उमर कॉलनी**-1, **खुसरो नगर**-1, **लेबर कॉलनी**-2, **तेहरा नगर**-2, **बाजीराव नगर**, **शोभा नगर**-1, **नई आबादी**-4, **खडकपुरा**-2 **बडीदर्गा**-1, **व्यंकटेशनगर**-1 **व बरकतपुरा** या अंगणवाडया हिंदी भाषिक अंगणवाडया असल्यामुळे ज्या उमेदवारांना हिंदी वाचता व लिहीता येते अशाच उमेदवारांची या अंगणवाडयांवर गुणानुक्रमे निवड करण्यात येईल.

5.वरील पदासाठी अर्ज दाखल करतेवेळी अर्जासोबत जोडलेल्याच गुणपत्रकांचा व प्रमाणपत्रांचा विचार केला जाईल. व त्या आधारेच शैक्षणिक व इतर अर्हतेचे गुणांकन ग्राह्य धरले जाईल. उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांना पेजींग करणे बंधनकारक आहे. अर्ज दाखल करण्याच्या अंतिम तारखेच्या कार्यालयीन वेळेनंतर कोणतेही कागदपत्र स्विकारले जाणार नाहीत.

6.अंगणवाडी मदतनीस या रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे तसेच पद रद्द करण्याचे व कोणत्याही टप्प्यावर अंशत: अथवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी नांदेड शहर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

7.सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त न झाल्यास व प्राप्त अर्जावर अर्जदार यांची स्वाक्षरी नसल्यास,अपुर्ण व त्रुटी असलेले तसेच अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे नसलेले अर्ज फेटाळण्यात येतील. तसेच अपात्र ठरविण्यात आलेल्या अर्जदारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्ररीत्या कळविण्यात येणार नाही. तसेच विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त न होणारे अर्ज अपात्र ठरतील. तसेच सदर मुदतीत प्राप्त न झालेल्या अर्जांबाबत या कार्यालयामार्फत कोणतेही कार्यवाही करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

8.अर्जासोबत सादर करण्यात येणारी सर्व कागदपत्रे उमेदवाराने सक्षम प्राधिकारी यांचेकडून साक्षांकित अथवा स्वसाक्षांकित करून सादर करावीत.

9. अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना बदलीचे कोणतेही प्रावधान असणार नाही.

10.वाचा क्रमांक 07 च्या शासन निर्णयानुसार गुणांकन करावयाचे असल्याने अर्जदार यांनी आपले शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्र व गुणपत्रकाची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील तसेच लागू असल्यास जात, अनुभव, विधवा / अनाथ प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील अन्यथा गुण देण्यात येणार नाहीत. तसेच प्राप्त अर्जासोबत जे गुणपत्रके व प्रमाणपत्रके सादर करण्यात आलेले आहेत त्यास अनुसरून गुण देण्यात येतील. विहित मुदतीनंतर कोणतेही कागदपत्रे स्वीकारले जाणार नाहीत व गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती ह्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून किंवा स्वयंसाक्षांकित केलेल्या असाव्यात. तसेच ज्या प्रमाणपत्रात खाडाखोड असेल किंवा प्रमाणपत्राबाबत या कार्यालयास शंका वाटत असल्यास त्याची मूळ प्रत उमेदवाराने पडताळणीसाठी या कार्यालयाने मागणी केल्यानंतर तात्काळ विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील.

11.अर्जदाराने अर्जासोबत कोणतेही बनावट कागदपत्रे / दस्ताऐवज सादर करू नये.नियुक्तीनंतरही बनावट कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसेच शासनाच्या फसवणुकीचा आरोप ठेवून अर्जदार व संबंधिता विरूध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

12.विवाहीत उमेदवारांनी विवाहापुर्वीचे नाव आणि विवाहनंतरचे नाव या दोन्ही व्यक्ती एकच असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सोबत जोडावे.

13.अंगणवाडी मदतनिस या मानधनी पदासाठी केंद्र / राज्य शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले मानधन व इतर लाभ देण्यात येतील. सदरील नेमणुका ह्या पुर्णत: तात्पुरत्या व मानधनी स्वरूपाच्या आहेत. वाचा क्रमांक 01 च्या शासन निर्णयान्वये नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या अंगणवाडी मदतनीस यांची सेवा समाप्ती ही वयाची 60 वर्षे राहील.

14.मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या दिवाणी याचिका क्र.4953-4957 सन 1998 च्या न्याय निर्णयात दिलेल्या आदेशानुसार अंगणवाडी सेविका व मदतनीस ह्या कोणतेही नागरी पद (Civil Post) धारण करीत नाहीत आणि त्यांना किमान वेतन कायदा लागु नाही याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

15.सर्व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्राप्त अर्जाची छाननी करून उमेदवारांची प्राथमिक यादी ज्यात शिक्षण, वय, प्रवर्ग, अपत्य, विधवा / अनाथ इत्यादीसाठी उमेदवारांच्या प्रमाणपत्रावरुन वाचा क्रमांक 07 मधील शासन निर्णयातील परिशिष्टाप्रमाणे निश्चित गुण देऊन परिशिष्ट 'ब' मधील यादीतील कोणत्याही उमेदवाराचे प्रमाणपत्र व दिलेले गुण याबाबत तक्रार असल्यास अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी प्राथमिक यादी घोषित केलेल्या दिनांकापासून 10 दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी तक्रार सादर करावी. तद्नंतर प्राप्त तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत. (तक्रार कालावधी दरम्यान कोणतेही नवीन कागदपत्रे स्वीकारले जाणार नाहीत.)

16.अंगणवाडी मदतनिस यांच्या रिक्त पदांची सदरची भरती प्रक्रिया ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

17. अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांकानंतर अर्ज तपासणी झाल्यावर प्राथमिक यादी प्रकाशन तसेच उमेदवारांना वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना हया https://nanded.gov.in या वेबसाईटवर तसेच कार्यालयीन नोटिस बोर्ड येथे प्रकाशित करण्यात येईल याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

18. जाहिरातीमध्ये दिलेल्या विहित नमुण्यातीलच अर्ज करावा. सदरील अर्जाचा विहित नमुना https://nanded.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

19. भरती प्रक्रीयेसंबधी अर्जदारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्ती प्रमाणे असून वेळोवेळी सूचना कार्यालयीन नोटिस बोर्डावर लावण्यात येतील, तसेच https://nanded.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

(**अर्जदाराने जाहिरातीतील अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचूनच अर्ज परिपुर्ण भरणे अर्जदाराच्या हिताचे राहील**.)

**सोबत**:- 1.अर्जाचा विहित नमुना.
2.लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र नमुना.
3.विधवा महिलांसाठी पुनर्विवाह केला नसल्याचे स्वयंघोषणा प्रमाणपत्र नमुणा.

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**नागरी नांदेड शहर**

# अंगणवाडी मदतनिस (मानधनी) पदासाठीचा अर्ज नमूना

**कार्यालयीन उपयोगासाठी**

| | |
|---|---|
| **आवक क्रमांक** | |
| **दिनांक** | |

फोटो (उमेदवाराचे अलिकडील काळातील काढलेला रंगीत फोटो लावुन स्वाक्षरी करावी)

**प्रति,**

**मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी**
**नांदेड शहर**.

मी नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका क्षेत्रातील प्रभाग क्र.------------- राहणार (कायमचा संपुर्ण पत्ता) ----------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

येथील स्थानिक रहीवाशी असून जाहिरातीमधील नमूद **अंगणवाडी मदतनिस** या पदासाठी अर्ज केला आहे. माझी वैयक्तीक माहिती खालीलप्रमाणे आहे.

<table>
<tr><td>1</td><td colspan="2">उमेदवाराचे संपूर्ण नाव:-<br>(शालांत प्रमाणपत्रानुसार)</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>2</td><td colspan="2">रहिवाशी संपूर्ण पत्ता:-<br>(स्थानिक रहिवाशी पुरावा सोबत जोडावा) (आधार कार्ड / मतदार ओळखपत्र / तहसिलदार निर्गमित रहिवाशी प्रमाणपत्र)</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td rowspan="2">3</td><td colspan="2" rowspan="2">जन्म दिनांक<br>(शाळेचा दाखला (T.C.) / 10 वी ची सनद / प्रमाणपत्र सोबत जोडावे)</td><td rowspan="2"></td><td rowspan="2">जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांकास वय (दिनांक 08.04.2025 रोजीचे वय)</td><td>वर्षे</td><td>महिना</td><td>दिवस</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>4</td><td colspan="2">विवाहीत असल्यास संपुर्ण नाव:-</td><td colspan="5">सौ.</td></tr>
<tr><td>5</td><td colspan="2">हयात अपत्यांची संख्या:-</td><td></td><td colspan="4">शेवटच्या मुलाचा जन्म दिनांक:-</td></tr>
<tr><td>6</td><td colspan="7">मागासवर्गीय आहात काय ? होय☐ नाही ☐ असल्यास जात:- जातीचा प्रवर्ग:-<br>(प्रमाणपत्र सोबत जोडावे)</td></tr>
<tr><td>7</td><td colspan="7">विधवा /अनाथ आहे काय ? होय☐ नाही ☐(असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)<br>(विधवा असल्यास- पतीचे मृत्यु प्रमाणपत्र, विधवा असुन पुर्नविवाह केलेला नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडावे)</td></tr>
<tr><td>8</td><td colspan="3">शैक्षणिक पात्रता:- (किमान 12 वी उत्तीर्ण आवश्यक)</td><td colspan="4">उमेदवाराची मातृभाषा:-</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td>परिक्षा</td><td>परिक्षा बोर्ड / विद्यापीठ</td><td>उत्तीर्ण झाल्याचे वर्षे</td><td>प्राप्त गुण</td><td>एकुण गुण</td><td colspan="2">टक्केवारी</td></tr>
<tr><td>1.</td><td>12 वी (HSC)</td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>2.</td><td>पदवी (3 वर्षाची)</td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>3.</td><td>पदव्युत्तर पदवी</td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>4.</td><td>B.Ed</td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>5.</td><td>D.Ed</td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>6.</td><td>शासकीय मान्यताप्राप्त संस्थेचेसंगणक प्रमाणपत्र(MS-CIT)</td><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="2">9.</td><td colspan="7">अर्जासोबत जोडावयाची साक्षांकित कागदपत्रे यादी</td></tr>
<tr><td colspan="3">1.विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरीत रंगीत फोटो लावलेला अर्ज</td><td colspan="4">2.आधार कार्ड / मतदार ओळखपत्र / तहसिलदार यांच्याव्दारे निर्गमित रहिवाशी प्रमाणपत्र</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | 3.शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे (12 वी, पदवी, D.Ed, B.Ed, (MS-CIT) | 4. विधवा /अनाथ प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| | 5.शाळेचा दाखला (T.C.) व 10 वी ची सनद व मार्क मेमो | 6.अंगणवाडी सेविका / मदतनिस / मीनी अंगणवाडी सेविका म्हणुन काम केल्याचा अनुभव प्रमाणपत्र (लागु असल्यास) |
| | 7.जात प्रमाणपत्र (लागु असल्यास) | 8.लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र (सर्व महिला उमेदवारांसाठी) |
| | 9.विवाहित उमेदवाराने विवाहापुर्विचे नाव आणि विवाहानंतरचे नाव या दोन्ही व्यक्ती एकच असल्याबाबत प्रतिज्ञापत्र जोडावे | 10.विधवा महिलांनी पुर्नविवाह केला नसल्याबाबत स्वंयघोषणा प्रमाणपत्र (लागु असल्यास) |

10.**अवगत असलेल्या भाषा**.

| अ.क्र. | बोलता येणाऱ्या भाषा | लिहिता येणाऱ्या भाषा | वाचता येणाऱ्या भाषा |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |

11.**अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस म्हणून अनुभव आहे काय? होय / नाही असल्यास खालील माहिती भरावी तसेच संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र सोबत जोडावे**.

**अ) अंगणवाडी सेविका / मदतनिस / मिनी अंगणवाडी सेविका पदाचा अनुभव**:-------------------------------------------

**ब) अनुभव कालावधी**:-------------------------------------------------------

**क) अंगणवाडी केंद्राचे नाव व प्रकल्पाचे नाव**:----------------------------------------------------------------------------------------------

मी (संपूर्ण नाव)------------------------------------------------------------------------------------------------------------------ असे प्रमाणित करते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका अंतर्गत शहरी क्षेत्रातील अंगणवाडी मदतनिस च्या रिक्त पदे भरण्यासाठी प्रसिध्द करण्यांत आलेली जाहिरात मी पुर्णपणे वाचली असून त्या अनुषंगाने मी अर्जात नमूद केलेली माहिती खरी आहे. त्याचे पृष्ठर्थ मी प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडल्या आहेत. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास मी मानधनी पदाकरिता केलेला अर्ज / नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे. मी सक्षम प्राधिकारी यांचे रहिवाशी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र व शैक्षणिक कागदपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास त्याबाबतचे गुण किंवा लाभ मला मिळणार नाहीत याची मला जाणीव आहे. एखादे प्रमाणपत्र काढण्यासाठी प्रस्ताव सादर केल्याची पावती किंवा दस्तावेज या आधारे मला त्याबाबतचा लाभ किंवा गुण मिळणार नाहीत याची सुध्दा मला जाणीव आहे. तसेच हे पद मानधनी तत्वावर असून केंद्र शासन व राज्य शासन यांचे शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरून नियमाप्रमाणे देय असलेले मानधन तसेच त्यातील अटी / शर्ती / सुचना मला मान्य राहतील. निवड प्रक्रियेविरुध्द तक्रार अथवा अपील दाखल झाल्यास सक्षम प्राधिकरणाने दिलेला निर्णय मला मान्य राहील.

**ठिकाण**:-

**दिनांक**:-

**अर्जदाराचे पूर्ण नाव स्वाक्षरी व मो.नं.**

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

**सुचना**:-

1. **उमेदवाराने फॉर्म काळजीपुर्वक वाचुन समजेल अश्या स्वहस्ताक्षरात पुर्णपणे भरावा**.
2. **फॉर्मवर खाडा-खोड करू नये**.
3. **एका उमेदवाराने केवळ एकच फॉर्म भरावा, एकापेक्षा अधिक अर्ज केल्यास अपात्र केले जाईल याची नोंद घ्यावी**.
4. **सोबत दिलेले लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सर्व महिला उमेदवारांनी भरणे अनिवार्य आहे**.

# -:लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र:-

मी श्रीमती / कुमारी ---------------------------------------------------------------------------------------------------------------

श्री / श्रीमती ------------------------------------------------------------------------------------यांची मुलगी / पत्नी वय ------------- वर्षे

राहणार --------------------------------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते की,

1) मी अंगणवाडी **मदतनीस** या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.
2) आज रोजी मला खालीलप्रमाणे हयात अपत्ये (मुले / मुली) आहेत.

| **अ.क्र.** | **मुलाचे / मुलीचे नाव** | **जन्मतारीख** | **वय** |
|---|---|---|---|
| -1- | -2- | -3- | -4- |
| | | | |
| | | | |
| | | | |

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी मी अपात्र ठरविण्यात किंवा कमी करण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.
4) मला दोन पेक्षा जास्त मुले होणार नाहीत. जर मला दोनपेक्षा जास्त अपत्य झाल्यास मी सदरील पदासाठी अपात्र होईल. मी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती खरी असून अर्जातील कोणतीही माहिती अथवा प्रमाणपत्र खोटे आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व माझे विरूध्द भारतीय दंड संहिता नुसार कारवाई करण्यास माझी हरकत नाही.

**ठिकाण**:-

**दिनांक**:-

**अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**

---------------------------------

---------------------------------

**(फक्त विधवा महिलांकरीता इतर उमेदवारांनी जोडू नये)**

**पुनर्विवाह केला नसल्याबाबत स्वंयघोषणा प्रमाणपत्र**

मी श्रीमती------------------------------------------ वय-------- राहणार---------------------------------------------- लिहून देते की, माझे पती (नाव) ----------------------------------------------- यांचा मृत्यु दि.--------------------- रोजी झाला असून (मृत्यू प्रमाणपत्र सोबत जोडावे) पतीच्या मृत्यूनंतर मी पुनर्विवाह केला नाही. करिता स्वयंघोषणा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सदरची माहिती चुकीची / खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास माझी नियुक्ती रद्द केल्या जाईल याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**

-----------------------------------

-----------------------------------

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६, दिनांक ३० जानेवारी,२०२५ सोबतचे परिशिष्ट

| बाब | एकूण गुण | अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस (किमान अर्हता १२ वी उत्तीर्ण) | |
|---|---|---|---|
| | | शैक्षणिक अर्हता | द्यावयाचे गुण |
| शैक्षणिक अर्हता | ८० गुणांपर्यंत | १) बारावी | |
| | | ८० % पेक्षा जास्त | ६० |
| | | ७०.०१ ते ८०% | ५५ |
| | | ६०.०१ ते ७०% | ५० |
| | | ५०.०१ ते ६०% | ४५ |
| | | ५०% ते ४० % | ४० |
| | | **टिप:-** ज्या उत्तीर्ण उमेदवारांना ४० % पेक्षा कमी गुण असतील त्यांना सरासरी ३५ गुण ग्राह्य धरण्यात येतील. | |
| | | २) पदवीधर | १० |
| | | ३) पदव्युत्तर | ४ |
| | | ४) डी.एड. | २ |
| | | ५) बी. एड. | २ |
| | | ६) शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असल्यास | २ |
| अतिरीक्त गुण | २० गुणांपर्यंत | | |
| विधवा /अनाथ | | | १० |
| अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती | | | ०५ |
| इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग / सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग | | | ०३ |
| अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षांचा अनुभव असल्यास | | | ०५ |